**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2020, VOL- 8/61*

# ऑनलाइन अध्यापनात बहुभाषिकता विषयक रणनीतीच्या अंमलबजावणीचा अभ्यास

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन, सिंहगड रोड हिंगणे खुर्द पुणे51*

**Abstract**

*भारतात जानेवारी 2020 मध्ये covid-19 चा पहिला रुग्ण आढळून आला. कोरोना महामारीची झळ सर्वच क्षेत्रांना बसली. त्यामुळे विविध क्षेत्रांमध्ये खूप बदल घडून आले. कोरोना महामारीचा परिणाम म्हणून शिक्षण क्षेत्रातही अध्यापन, अध्ययन, मूल्यमापन यांमध्येही बदल झाल्याचे दिसून आले. शिक्षण क्षेत्रातील बदलाचा भाग म्हणूनच ऑनलाईन अध्यापन, अध्ययन व मूल्यमापन या संकल्पना प्रकर्षाने पुढे आल्या.*

*अध्यापन अध्ययन ही पूर्णतः बौद्धिक, मानसिक व भावनिक प्रक्रिया आहे . अध्यापन अध्ययन ही प्रक्रिया भाषेच्या माध्यमातूनच घडते. शिक्षक अध्यापन करताना केवळ एका भाषेचाच वापर करतात? की दोन भाषांचा वापर करतात? की दोन पेक्षा अधिक भाषांचा म्हणजेच बहुभाषिक ते चा वापर करतात? याचा विचार होणे आवश्यक आहे.*

***की वर्ड:*** *कोरोना महामारी, ऑनलाइन अध्यापन अध्ययन, बहुभाषिक रणनीती*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

## 1 ) प्रस्तावना

कोरोना महामारी आणि टाळेबंदी यामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. covid-19 चा परिणाम म्हणून शिक्षण व्यवस्थेलाही काही बदल स्वीकारावे लागलेले आहेत . म्हणूनच ऑनलाइन शिक्षण हा मुद्दा पुढे आला पारंपारिक शिक्षण पद्धतीत प्रत्यक्ष शाळा , महाविद्यालय , विद्यार्थी, त्यांचे मित्र , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी शाळा महाविद्यालयाचे क्रीडांगण , प्रयोगशाळा , वर्गखोल्या, बाग यांसारखे नैसर्गिक वातावरण पाहावयास मिळते . प्रत्यक्ष शाळेत विद्यार्थी या नैसर्गिक शैक्षणिक वातावरणामुळे जास्तीत जास्त काळ शिक्षणात रस घेऊन मनापासून शिकण्याचा प्रयत्न करीत असतात. तसेच शिक्षकही प्रत्यक्ष नैसर्गिक शैक्षणिक वातावरणात उत्साहपूर्वक सहज नैसर्गिकरित्या आनंदाने अध्यापनाची प्रक्रिया पार पाडीत असतात अध्यापन अध्ययन ही प्रक्रिया पूर्णतः मानसिक, बौद्धिक , भावनिक प्रक्रिया असून यामध्ये विद्यार्थ्यांचा वयोगट , आवड, मानसिक स्थिती , विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक , विद्यार्थ्यांचे अवधान, व्यक्ती भेद या व अशा अनेक घटकांचा अध्यापन अध्ययन प्रक्रियेवर परिणाम होत असतो . विद्यार्थ्यांचे अवधान फार काळ एकाच गोष्टीकडे केंद्रित होऊ शकत नाही covid-19 चा परिणाम म्हणून ऑनलाईन शिक्षण हा विचार जरी पुढे आला असला तरी मोबाईल , लॅपटॉप कम्प्युटरच्या स्क्रीनवर विद्यार्थी किती काळ लक्ष केंद्रित करतील? हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित होतो.

दैनंदिन प्रत्यक्ष अध्यापन अध्ययनातही विद्यार्थ्यांना काही अध्ययन विषयक समस्या निर्माण होतात या समस्या शिक्षक व विद्यार्थी प्रत्यक्ष चर्चा करून प्रश्नोत्तराद्वारे विद्यार्थ्यांचा शाब्दिक सहभाग घेऊन तसेच शिक्षकांकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन करून सोडविण्याचा प्रयत्न केला जातो . हे सर्व भाषेतून घडत असते मात्र ऑनलाइन अध्यापन अध्ययनात या प्रक्रियेत काही प्रमाणात मर्यादा येतात. अध्यापन अध्ययन प्रक्रिया ही भाषेच्या माध्यमातून होते

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शिक्षक अध्यापनासाठी वापरत असलेली भाषा आणि विद्यार्थी अध्ययनासाठी ज्ञानग्रहण यासाठी उपयोगात आणत असणारी भाषा याला खूप महत्त्व आहे.

शाळेला समाजाची प्रतिकृती म्हटले जाते . शाळेत येणारा विद्यार्थी समाजाचाच एक घटक असतो. भाषेच्या बाबतीत समाजात जसे वेगळेपण दिसते तसेच वेगळेपण शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषांमध्येही दिसून येते मात्र शाळेतील विद्यार्थ्यांना अध्ययन करावी लागणारी पाठ्यपुस्तके व अध्ययनाचे घटक प्रमाण भाषेतून शिकावे लागतात. तसेच शिक्षकांनाही पाठ्यपुस्तके व पाठ्य घटक प्रमाण भाषेतून शिकवावे लागतात . मात्र शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना प्रमाणभाषेचा परिचय असतोच असे नाही कारण शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही ग्रामीण, शहरी , डोंगराळ भागातील , आदिवासी भागातील विद्यार्थी असे भेद दिसून येतात . शाळेतील विद्यार्थ्यांच्या मातृभाषा , बोलीभाषा वेगवेगळ्या असतात . अध्यापन प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी विद्यार्थ्यांचे अध्ययनही सहज सोपे , अर्थपूर्ण , आनंददायी होण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी केवळ विशिष्ट एका भाषेचा आग्रह धरून चालणार नाही किंवा फक्त प्रमाण भाषेचाच किंवा मातृभाषाचाच किंवा फक्त बोली भाषांचाच अट्टाहास करणे उपयुक्त ठरणार नाही. म्हणूनच 2014 च्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या दोन वर्ष बी एड अभ्यासक्रम आराखड्यात अभ्यासक्रमांतर्गत भाषेची व्याप्ती ( Language Across Curriculum ) या विषयाचा समावेश करून बहुभाषिकते ( Multilingualism ) वर भर देण्यात आलेला आहे.

**2 ) समस्या विधान** कोरोना महामारी दरम्यान अध्यापन अध्ययन प्रक्रियेत बहुभाषिकता विषयक रणनीतीच्या अंमलबजावणी चा अभ्यास .

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने कोरोना महामारी दरम्यान अध्यापन अध्ययन प्रक्रियेत बहुभाषिकता विषयक रणनीतीच्या अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी बहुभाषिकतेवर आधारित दहा प्रश्न तयार करून 1 ते 5 बिंदू वलीची पदनिश्चयन श्रेणी तयार करून 42 प्रतिसादकांकडून ती भरून घेतली प्रतिसादकांनी बहुभाषिकतेवर आधारित दहा प्रश्नांना एक ते पाच बिंदुवलीनुसार दिलेल्या प्रतिसादांचा विचार करून शेकडेवारीच्या आधारे विश्लेषण करण्यात आले.

**3 ) संशोधनाची गरज व महत्त्व**

**3.1 गरज-** संशोधक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे संशोधकाच्या असे लक्षात आले की covid-19 चा परिणाम म्हणून ऑनलाइन शिक्षण सुरू झाले . मात्र प्रत्यक्ष शाळेतील अध्यापन अध्ययन व डिजिटल स्वरूपातील ऑनलाइन द्वारे अध्यापन अध्ययन यामध्ये फरक आहे . अध्यापन अध्ययन ही प्रक्रिया भाषेच्या माध्यमातून घडते म्हणूनच येथे शिक्षक अध्यापनासाठी एक भाषा वापरतात? दोन भाषा वापरतात ? की बहू भाषा वापरतात? या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी संशोधकास प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता वाटते.

**3.2 महत्व**- covid-19 चा परिणाम म्हणून ऑनलाइन शिक्षण व्यवस्था निर्माण झाली मात्र ही शिक्षण व्यवस्था ऑनलाइन असली तरी किंवा पारंपरिक पद्धतीची असली तरी ज्ञान देण्याचे व ज्ञान घेण्याचे तसेच ज्ञान व्यक्त करण्याचे माध्यम ही भाषाच आहे . शिक्षण प्रक्रियेत शिक्षक, विद्यार्थी व पालकांनीही भाषेचा बारकाईने विचार

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

करावा तसेच केवळ प्रमाण भाषेचाच किंवा एका विशिष्ट भाषेचाच आग्रह धरता कामा नये किंवा मातृभाषेचाच विचार करून चालणार नाही . अध्यापन अध्ययन प्रक्रिया प्रभावी झाली तरच मूल्यमापनही चांगले होते. या सर्व घटकांचा सकारात्मक परिणाम म्हणून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. यासाठीच विविध शिक्षण आयोग 1964- 66 चा कोठारी आयोग 1986 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांनी भाषा शिक्षणावर भर दिलेला आहे 2014 च्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या दोन वर्ष बी एड अभ्यासक्रम आराखड्यातही अभ्यासक्रमांतर्गत भाषेची व्याप्ती या विषयात बहुभाषिकतेवर भर दिलेला आहे. बहुभाषिकतेचे फायदे शिक्षक, विद्यार्थी , पालक यांना समजावेत म्हणून संशोधकास प्रस्तुत संशोधन महत्त्वपूर्ण वाटते.

**4 ) संदर्भ साहित्याचा आढावा**

4.1( 24 Sept. 2020 ) *Strenthening online learning when schools are closed : The Role of families and teachers in supporting students during the covid-19 crisis*

प्रस्तुत संशोधनामध्ये कोरोना महामारी दरम्यान शाळा बंद असताना ऑनलाइन शिक्षणास बळकटी देण्यासाठी कुटुंब शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भूमिका काय असावी याविषयी संशोधन करण्यात आलेले आहे.

4.2 (2020 ) *The perception of primary schoolTeachers of online Learning during the Covid-19 pandemic period : A case study in Indonesia*

प्रस्तुत संशोधनामध्ये कोरोना महामारीच्या काळात इंडोनेशियातील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन अध्यापन याबाबतच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**5 ) संशोधनाची उद्दिष्टे**

1 ) ऑनलाइन अध्यापन अध्ययन प्रक्रियेत बहुभाषिकता विषयक रणनीतीच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती माहिती करून घेण्यासाठी प्रश्नावलीची निर्मिती करणे.

2 ) बहुभाषिकता रणनीती अंमलबजावणी प्रश्नावलीचे वितरण करणे .

3 ) बहुभाषिकता रणनीती अंमलबजावणी प्रश्नावलीतून प्राप्त प्रतिसादांचे संकलन व विश्लेषण करणे .

4 ) बहुभाषिकता रणनीतीची अंमलबजावणी प्रश्नावलीद्वारे फलिते व निष्कर्षाची मांडणी करणे .

**6 ) कार्यात्मक व्याख्या**

**6.1 कोरोना महामारी**- covid-19 हा कोरोना विषाणू संसर्गजन्य रोग आहे. पहिल्या संक्रमित व्यक्तीची डिसेंबर 2019 मध्ये पॉझिटिव चाचणी झाली म्हणून त्याला covid-19 असे म्हणतात .

कोरोना महामारी- कोरोना विषाणू मुळे सर्दी, खोकला, ताप , अंगदुखी अशा लक्षणांमुळे श्वसनसंबंधीचा संसर्गजन्य आजार होणे म्हणजे कोरोना महामारी. ही महामारी कोरोना विषाणू संक्रमित मानवी थुंकीद्वारे व नाकातील सर्दीद्वारे उडणारे तुषाराचे थेंब यापासून पसरते .

**6.2 ऑनलाइन अध्यापन अध्ययन**- शिक्षक व विद्यार्थी प्रत्यक्ष समोरासमोर नसताना माहिती तंत्रज्ञान साधनांद्वारे डिजिटल स्वरूपात लॅपटॉप , मोबाईल , संगणकाच्या आधारे वर्च्युअल स्क्रीन समोर शिकविणे व शिकणे म्हणजे ऑनलाइन अध्यापन अध्ययन.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**6.3 बहुभाषिक रणनीती**- शालेय पाठ्य पुस्तकातील आशय किंवा पाठ्य घटक विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी शिक्षक एका भाषेबरोबर दोन किंवा अधिक भाषांचा वापर करण्यासाठी कौशल्यपूर्वक करीत असलेल्या सर्व कृती व योजना म्हणजे बहुभाषिक रणनीती .

**7 ) संशोधन पद्धती**- प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधनातील सर्वेक्षणाचा अवलंब केलेला आहे.

**8 ) संशोधन प्रश्न**- कोरोना महामारी दरम्यान ऑनलाइन अध्यापन अध्ययनासाठी शिक्षक कोणत्या बहुभाषिक रणनीतीचा अवलंब करतात?

**9 ) गृहीतके**

कोरोना महामारीत ऑनलाईन अध्यापन अध्ययन ही गरज बनली.( NCERT UNESCO guidelines for online learning,June 5,2020 )

शिक्षक शिक्षण परिषदेच्या दोन वर्षाच्या शिक्षण शास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या आराखड्यात बहुभाषीकतेवर भर देण्यात आलेला आहे. (NCTE Two Year B.Ed Curriculum, page 12 )

**10 ) व्याप्ती मर्यादा परि मर्यादा**

**10.1 व्याप्ती** - प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील ऑनलाईन अध्यापन करणाऱ्या सर्व माध्यमिक शिक्षकांशी संबंधित आहे.

**10.2 मर्यादा**- प्रस्तुत संशोधन ऑनलाईन अध्यापन करणाऱ्या पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकाशी संबंधित आहे .

**10.3 परि मर्यादा**- प्रस्तुत संशोधनात कोरोना महामारी दरम्यान ऑनलाइन अध्यापनात शिक्षकांच्या बहुभाषिकता विषयक रणनीतीच्या अंमलबजावणी संबंधित असून 42 माध्यमिक शिक्षकांशी संबंधित आहे.

**11 ) जनसंख्या नमुना निवड व नमुना**

**11.1 जनसंख्या**- प्रस्तुत संशोधनासाठी पुणे जिल्ह्यातील सर्वच विद्यालया मधील सर्व माध्यमिक शिक्षक जनसंख्या आहे.

**11.2 नमुना निवड**- प्रस्तुत संशोधनासाठी असंभाव्यतेवर आधारित सहेतुक पद्धतीने माध्यमिक शिक्षकांची निवड केली.

**11.3 नमुना**- पुणे जिल्ह्यातील 10 माध्यमिक शाळांमधील 42 माध्यमिक शिक्षक .

**12 ) माहिती संकलनाचे साधन**- प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी बहुभाषिकतेवर आधारित 10 प्रश्नांची बहुभाषिकता वापराचे मापन करणारी 1 ते 5 बिंदुवलीची पदनिश्चयन श्रेणी तयार करण्यात आली तसेच ती 42 माध्यमिक शिक्षकांकडून भरून घेऊन माहितीचे संकलन करण्यात आले .

**13 ) माहितीचे विश्लेषण**- प्रस्तुत संशोधनात बहुभाषिकतेवर आधारित बहुभाषिकता वापराचे मापन करणारी दहा प्रश्नांची १ ते ५ बिंदुवलीची पदनिश्चयन श्रेणी भरून घेण्यात आली ४२ माध्यमिक शिक्षक प्रतिसादकांनी १ ते ५


बिंदुवलीनुसार कसा प्रतिसाद दिलेला आहे याचा विचार करून शेकडेवारी काढून संकलित माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

**13.1 संशोधन प्रश्नाचे विश्लेषण**- ऑनलाइन अध्यापन अध्ययनासाठी शिक्षक साधारणपणे बहुभाषिकतेचा वापर करतात.

**संकलित माहितीचे विश्लेषण**

बहुभाषिकता वापराचे मापन करणाऱ्या पद निश्चयन श्रेणीचे प्रतिसादानुसार विश्लेषण तक्ता क्र 1


| | कधीच नाही 1 | क्वचीत 2 | गरजेनुसार 3 | बहुधा 4 | नेहमीच 5 |
|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्र 1 | 9 | 7 | 16 | 4 | 6 |
| प्रश्न क्र 2 | 1 | 7 | 21 | 5 | 8 |
| प्रश्न क्र 3 | 2 | 6 | 18 | 6 | 10 |
| प्रश्न क्र 4 | 1 | 8 | 15 | 10 | 8 |
| प्रश्न क्र 5 | 1 | 11 | 10 | 13 | 7 |
| प्रश्न क्र 6 | 0 | 5 | 9 | 11 | 17 |
| प्रश्न क्र 7 | 3 | 6 | 12 | 8 | 13 |
| प्रश्न क्र 8 | 10 | 19 | 2 | 9 | 2 |
| प्रश्न क्र 9 | 1 | 8 | 9 | 13 | 11 |
| प्रश्न क्र 10 | 22 | 4 | 2 | 8 | 6 |
| एकूण | 50 | 81 | 114 | 87 | 88 |




*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**बहुभाषिकता वापराचे मापन करणाऱ्या पद निश्चयन श्रेणीचे टक्केवारीनुसार विश्लेषण तक्ता क्र २**

| | कधीच नाही 1 | क्वचीत 2 | गरजेनुसार 3 | बहुधा 4 | नेहमीच 5 |
|---|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | टक्केवारी | टक्केवारी | टक्केवारी | टक्केवारी |
| प्रश्न क्र 1 | 21 | 16.66 | 38 | 9.52 | 14 |
| प्रश्न क्र 2 | 2 | 16.66 | 50 | 11.9 | 19 |
| प्रश्न क्र 3 | 4.76 | 14 | 42.85 | 14 | 23.8 |
| प्रश्न क्र 4 | 2 | 19 | 35.71 | 23.8 | 19 |
| प्रश्न क्र 5 | 2 | 26 | 23.8 | 30.95 | 16.66 |
| प्रश्न क्र 6 | 0 | 11.9 | 21 | 26 | 40 |
| प्रश्न क्र 7 | 7 | 14 | 28.57 | 19 | 30.95 |
| प्रश्न क्र 8 | 23.8 | 45 | 4.76 | 21 | 4.76 |
| प्रश्न क्र 9 | 2 | 19 | 21 | 30.95 | 26 |
| प्रश्न क्र 10 | 52 | 9.52 | 4.76 | 19 | 14 |



**14 ) निरीक्षण**

१ ) दैनंदिन अध्यापनामध्ये आपण एका भाषेचा वापर करता

या प्रश्नास ९ प्रतिसादकांनी कधीच नाही , ७ प्रतिसादकांनी क्वचित , १६ प्रतिसादकां गरजेनुसार , ४ प्रतिसादकांनी बहुधा , ६ प्रतिसादकांनी नेहमीच असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते .

२ ) दैनंदिन अध्यापनामध्ये आपण दोन भाषांचा वापर करता ?

या प्रश्नास १ प्रतिसादकाने कधीच नाही , ७ प्रतिसादकांनी क्वचित , २१ प्रतिसादकांनी गरजेनुसार, ५ प्रतिसादकांनी बहुधा, ८ प्रतिसादकांनी नेहमीच असा पर्याय नोंदविलेला आहे. हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते.

३ ) दैनंदिन अध्यापनामध्ये आपण बहुभाषिकतेचा वापर करता

या प्रश्नास २ प्रतिसादकांनी कधीच नाही, ६ प्रतिसादकांनी क्वचित , १८ प्रतिसादकांनी गरजेनुसार , ६ प्रतिसादकांनी बहुधा १० प्रतिसादकांनी नेहमीच असा असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते.

४ ) दैनंदिन अध्यापनामध्ये आपण विद्यार्थ्यांची संवाद साधताना बहुभाषिक तिचा वापर करता

या प्रश्नास १ प्रतिसादकाने कधीच नाही , ८ प्रतिसादकांनी क्वचित , १५ प्रतिसादकांनी गरजेनुसार , १० प्रतिसादकांनी बहुधा , ८ प्रतिसादकांनी नेहमीच असा असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते .

५ ) दैनंदिन अध्यापनामध्ये आपण विद्यार्थ्यांचा बहुभाषिक शाब्दिक सहभाग घेता

या प्रश्नास १ प्रतिसादकाने कधीच नाही ११ प्रतिसादकांनी क्वचित १० प्रतिसादकांनी गरजेनुसार १३ प्रतिसादकांनी बहुधा ७ प्रतिसादकांनी नेहमीच असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते.

६ ) आपल्या मते विद्यार्थ्यांचे आकलन प्रभावी होण्यासाठी बहुभाषिकता उपयुक्त ठरते

या प्रश्नास 0 प्रतिसादकांनी कधीच नाही ५ प्रतिसादकांनी क्वचित,९ प्रतिसादकां नी गरजेनुसार ११ प्रतिसादकांनी बहुधा १७ प्रतिसादकांनी नेहमीच असा असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते

७ ) आपण विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिकता जागरुकता वाढावी म्हणून प्रयत्न करता

या प्रश्नास ३ प्रतिसादकांनी कधीच नाही ६ प्रतिसादकांनी , क्वचित १२ प्रतिसादकांना गरजेनुसार , ८ प्रतिसादकांनी बहुधा , १३ प्रतिसादकांना नेहमीच असा असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते.

८ ) ऑनलाइन अध्यापन अध्ययनात काही भाषिक अडथळे येतात का

या प्रश्नास १० प्रतिसादकांनी कधीच नाही , १९ प्रतिसादकांनी क्वचित , २ प्रतिसादकांनी गरजेनुसार , ९ प्रतिसादकांनी बहुधा , २ प्रतिसादकांनी नेहमीच असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते.

९ ) आपल्यामध्ये ऑनलाइन अध्यापनात संवाद साधण्यासाठी बहुभाषिकता उपयुक्त ठरते

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

या प्रश्नास १ प्रतिसादकाने कधीच नाही ८ प्रतिसादकांनी क्वचित , ९ प्रतिसादकांना गरजेनुसार , १३ प्रतिसादकांनी बहुधा , ११ प्रतिसादकांना नेहमीच असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते .

१० ) आपल्यामध्ये विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करणे केवळ भाषा शिक्षकाची जबाबदारी आहे

या प्रश्नास २२ प्रतिसादकांनी कधीच नाही , ४ प्रतिसादकांनी क्वचित , २ प्रतिसादकांनी गरजेनुसार ८ प्रतिसादकांनी बहुधा , ६ प्रतिसादकांनी नेहमीच असा पर्याय नोंदविलेला आहे हे तक्ता क्रमांक १ वरून दिसून येते .

**15 ) अर्थनिर्वचन**

१ ) प्रश्न क्रमांक १ ला गरजेनुसार असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १६ तर बहुधा असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या ४ आढळून आली म्हणजेच दैनंदिन अध्यापनात एका भाषेचा वापर करणाऱ्यांची संख्या अधिक असून अधिक भाषांचा वापर करणाऱ्यांची संख्या कमी आहे .

२ ) प्रश्न क्रमांक २ ला गरजेनुसार असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या २१ असून कधीच नाही असा पर्याय देणाऱ्यांची संख्या एक आहे म्हणजेच दैनंदिन अध्यापनात दोन भाषांचा वापर करणाऱ्यांची संख्या अधिक असून दोन भाषांचा वापर न करणार्‍यांची संख्या एकदम कमी आहे .

३ ) प्रश्न क्रमांक ३ ला गरजेनुसार असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १८ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणाऱ्याची संख्या १ आहे म्हणजेच दैनंदिन अध्यापनामध्ये बहुभाषिकतेचा वापर केला जातो . बहुभाषिकतेचा वापर न करणाऱ्यांची संख्या नगण्य आहे .

४ ) प्रश्न क्रमांक ४ ला गरजेनुसार असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १५ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १ आहे म्हणजेच विद्यार्थ्यांशी संवाद साधताना काही प्रमाणात बहुभाषिकता वापरली जाते .

५ ) प्रश्न क्रमांक ५ ला बहुधा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १३ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १ आहे म्हणजेच विद्यार्थ्यांचा शाब्दिक सहभाग स्वीकारताना काही प्रमाणात बहुभाषिकतेला वाव दिला जातो .

६ ) प्रश्न क्रमांक ६ ला नेहमी असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या १७ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या शून्य आहे म्हणजेच विद्यार्थ्यांचे आकलन प्रभावी होण्यासाठी बहुभाषिकता उपयुक्त ठरते .

७ ) प्रश्न क्रमांक ७ ला नेहमीच असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या १३ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या ३ आहे म्हणजेच विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिकता वाढविण्यासाठी काही प्रमाणात शिक्षकांकडून प्रयत्न केला जातो .

८ ) प्रश्न क्रमांक ८ ला क्वचित हा प्रतिसाद देणार्‍यांची संख्या १९ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या १० आहे म्हणजेच ऑनलाईन अध्यापन अध्ययन यामध्ये काही प्रमाणात भाषिक अडथळे येतात .

९ ) प्रश्न क्रमांक ९ ला बहुधा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या १३ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या १ आहे म्हणजेच ऑनलाइन अध्यापन

अध्ययना मध्ये सुसंवाद साधण्यासाठी बहुभाषिकता उपयोगी ठरते .

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१० ) प्रश्न क्रमांक १० ला नेहमीच असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या ११ असून कधीच नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या २२ आहे म्हणजेच विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्याची जबाबदारी भाषा शिक्षकाबरोबर इतर शिक्षकांचीही आहे

**16 ) निष्कर्ष**

१ ) दैनंदिन अध्यापनामध्ये केवळ एका भाषेचा वापर करणारे १४ टक्के शिक्षक दिसून येतात तर अधिक भाषांचा वापर करणारे २१ टक्के शिक्षक दिसून येतात

२ ) दैनंदिन अध्यापनामध्ये दोन भाषांचा वापर करणारे ५० टक्के शिक्षक दिसून येतात तर दोन भाषांचा वापर न करणारे केवळ दोन टक्के शिक्षक दिसून येतात.

३ ) दैनंदिन अध्यापनामध्ये बहुभाषिकतेचा गरजेनुसार वापर करणारे ४२.८५ टक्के शिक्षक आढळून येतात तर बहुभाषिकतेचा वापर न करणारे केवळ ४.७६ टक्के शिक्षक दिसून येतात .

४ ) दैनंदिन अध्यापनामध्ये बहुभाषिकतेमधून विद्यार्थ्यांशी संवाद साधणारे ३५.७१ टक्के शिक्षक आढळतात तर बहुभाषिकतेमधून विद्यार्थ्यांशी संवाद न साधणारे केवळ दोन टक्के शिक्षक दिसून येतात .

५ ) दैनंदिन अध्यापनामध्ये ३०.९५ टक्के शिक्षक विद्यार्थ्यांचा बहुभाषिक शाब्दिक सहभाग स्वीकारतात तर फक्त २ टक्के शिक्षक बहुभाषिक शाब्दिक सहभाग स्वीकारीत नाहीत .

६ ) ४० टक्के शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांचे आकलन प्रभावी होण्यासाठी बहुभाषिकता उपयुक्त ठरते तर बहुभाषिकता उपयुक्त ठरत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या शून्य आहे .

७ ) ३०.९५ टक्के शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिकता वाढविण्यासाठी प्रयत्न करतात तर ७ टक्के शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिकता वाढविण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येत नाहीत .

८ ) ४५ टक्के शिक्षकांच्या मते ऑनलाईन अध्यापन अध्ययन यामध्ये क्वचित प्रसंगी भाषिक अडथळे येतात तर २३.८ टक्के शिक्षकांच्या मध्ये भाषिक अडथळे येत नाहीत .

९ ) ३०.९५ टक्के शिक्षकांच्या मध्ये ऑनलाइन अध्यापन अध्यायनामध्ये संवाद साधण्यासाठी बहुभाषिकता उपयुक्त ठरते तर केवळ २ टक्के शिक्षकांना बहुभाषिकता उपयुक्त वाटत नाही .

१० ) ५२ टक्के शिक्षकांच्या मध्ये विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्याची जबाबदारी भाषा शिक्षकांबरोबर इतर शिक्षकांचीही आहे असे वाटते तर केवळ १४ टक्के शिक्षकांना विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्याची जवाबदारी केवळ भाषा शिक्षकांचीच आहे असे वाटते .

**17 ) शिफारशी**

१ ) बहुसंख्य शिक्षक अध्यापनात केवळ एका भाषेचाच वापर करतात शिक्षकांनी अध्यापनात दोन किंवा अधिक भाषांचा वापर करावा .

२) दैनंदिन अध्यापन प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करताना शिक्षकांनी बहुभाषिकतेचा वापर करावा .

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३ ) विद्यार्थ्यांना अध्यापन घटकाचे आकलन प्रभावी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिकता रुजविण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे .

४ ) विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये बहुभाषिकता विषयक जागरुकता निर्माण करण्यासाठी भाषा शिक्षकाबरोबर सर्व शिक्षकांनी प्रयत्न करायला हवेत .

## संदर्भ

*पांडे, अविनाश, हरी मालती(२०१८) बहुभाषिकता : गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया, पुणे,युनिक अकादमी प्रकाशन.*
*सिंह ,दिलीप .(२००८) भाषा का संसार : नई दिल्ली : वाणी प्रकाशन.*
*Agnihotri,R.K(2006) Identity, and multilinguality:the case of India.*
*Bloom field , L. (1933) .Language.chicago:University of Chicago Press.*
*Bhagat,P,Panda M(2018) Use of Psycho-Semiotic resources in a multilingual science*
*Chatterji,S.K(1943) Languages and the Linguistic Problem, Bombay*
*Devy,G (2018) Peoples Linguistic Survey of India. Bhasha Research andPublication Centre, India.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*